# करसकमेचा योग्य वापर व्हावा

## 'इन्फोसिस'चे संस्थापक एन. आर. नारायणमूर्ती यांचे मत

**पुणे, ता. १९ :** ''भ्रष्टाचारमुक्त न्यायव्यवस्था, पारदर्शी करप्रणाली करण्याबरोबरच करांतून मिळणाऱ्या रकमेचा योग्य वापर व्हावा. सरकारने पायाभूत सुविधांची उभारणी, गरीब लोकांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी या रकमेचा वापर करायला हवा. आपण तरुणांना चांगले रोजगार आणि सुविधा देणार नाही, तोपर्यंत हा देश शांततामय बनू शकत नाही,'' असे मत 'इन्फोसिस'चे संस्थापक एन. आर. नारायणमूर्ती यांनी केले.

गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या २३ व्या पदवी प्रदान सभारंभावेळी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजीवकुमार, कुलगुरू डॉ. राजस परचुरे व्यासपीठावर उपस्थित होते.



**गोखले इन्स्टिट्यूट : पदवी प्रदान समारंभात बोलताना एन. आर. नारायणमूर्ती.**

या समारंभात १३१ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी आणि १३ जणांना पीएचडी प्रदान करण्यात आली. नारायणमूर्ती यांनी, 'दारिद्रय निर्मूलन आणि आर्थिक वृद्धी यात संस्कृतीची भूमिका' या विषयावर व्याखान दिले.

नारायणमूर्ती यांनी, आर्थिक प्रगतीमधील अडथळे सांगताना भ्रष्टाचारामुळे अर्थव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम विशद केले. आपण आपली आर्थिक संस्कृती बदलत नाही, तोपर्यंत प्रगती शक्य नाही. तसेच गरिबी आणि अन्याय जोपर्यंत आहे, तोपर्यंत देश प्रगत झाला, असे म्हणता येणार नाही, असेही ते म्हणाले.

देशातील भ्रष्टाचार कमी करून आर्थिक शिस्त आणण्याबरोबरच सरकार आणि करदाता नागरिक यांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने करप्रणाली संबंधी पारदर्शक धोरणे आखली पाहिजेत, असे सांगताना देशाला 'क्लोज माइंड' नव्हे; तर 'ओपन माइंड' संस्कृतीची गरज आहे, ती संस्कृती तरुणांनी विकसित करावी, असा संदेश नारायणमूर्ती यांनी दिला.